नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 05/01/2022 (बुधवार)

(दुपार)

---

## बुटीबोरी बस स्टॉप येथुन सोन्याचे दागीने व मोबाईल चोरीचा छडा लावुन लाखोंच्या मुद्देमालासह स्थानिक गुन्हे शाखेने केले गजाआड

दिनांक 04/01/2022 रोजी 14/00वा. दरम्यान एक महिला डफ्क चौक, बुटीबोरी येथील बस स्टॉप वरून नागपुर कडे जाणे करीता ट्रॅव्हल्स मध्ये चढत असतांना अज्ञात चोराने तिचे ताब्यातील बॅग मधील एक पिवळया रंगाची हॅन्डबॅग ज्यामध्ये सोन्याचे दागीने व मोबाईल अंदाजे 3,15,000/–रू चा माल असलेली हॅन्डबॅग चोरून नेलेली आहे.अशा महीला फीर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोस्टे बोरी येथे अप क्र 03/22 कलम 379 भादवि चा गून्हा नोंद करण्यात आला आहे.मा पोलीस अधिक्षक सा यांचे आदेशान्वये तसेच पोनि स्थागुशा नाग्रा यांचे मार्गदर्शनार्थ त्वरीत स्थागुशाच्या पथकाने घटणास्थळ गाठुन आरोपी बाबत शोध घेत असता पोलीस स्टेशन बुटीबोरी हद्दीतील नागपुर ते चंद्रपुर रोड वरिल आगमन सावजी हॅाटेल जवळ एका झाडाखाली एक महिला एका लहान मुलीसह संशयीतरित्या बसलेली असुन सदर महिला हि रा.रामेश्वरी टोली, अजनी नागपुर येथील बस स्टॅाप वरिल गर्दीचा फायदा घेवुन अशाच प्रकारे चोरी करणारी स–हाईत गुन्हेगार असण्याची शक्यता असल्याबाबत माहिती प्राप्त झाल्याने संशयीत महीला हिचे जवळ महीला पोलीस अंमलदार व स्टॅाफ च्या मदतीने महिलेस तिचे नाव पत्ता विचारले असता त्या महिलेने उडवाउडवीचे उत्तर दिले वरून त्या महिलेवर अधिक संशय बळावल्याने ा ताब्यात घेवुन महिलेच्या ताब्यातील बॅगची झडती महीला पोलीस अंमलदार यांनी घेतली असता चोरीस गेलेला मुददेमाल एक पिवळा रंगाची हॅन्डबॅग दिसली त्यामध्ये सोन्याचे दागीने एक सोन्याची चैन, पेंडंट एक सोन्याचे मंगळसुत्र ,चार सोन्याची अंगठी एकुण कि 3,35,000 व एक अंड्रॉईड जुना वापरता मोबाईल, किं. 10,000/–रू, असा एकुण 3,45,000/–रू चा माल महीला आरोपीचे ताब्यातुन जप्त करण्यात आला व सदर महीलेने चोरी केल्याचे कबुल केले.पुढील तपास पोस्टे बोरी करित आहे.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर नागपुर ग्रामीण, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणिकर ना. ग्रा. यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे यांचे आदेशाने सपोनि जितेंद्र वैरागडे ,राजु कर्मलवार ,पोउपनि /जावेद शेख ,पोहवा गजेंद्र चौधरी, नरेंद्र पटले ,महेश जाधव, रामा आडे, पोशि अमृत किनगे,रोहन डाखोरे ,अमोल वाघ,विपीन गायधने चापोहवा /भाउराव खंडाते मपोना/स्वाती हींडोरिया व सायबर सेल पोना/सतीश राठोड ,मपोना/स्नेहलता,संगीता तसेच पोस्टे बोरी मपोउपनि/रिजवाड ,पोहवा/संजय बान्ते यांनी केली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर